PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Chintu
Year: 2012

Song: Parikshela Teen Divas
Lyricist: Sandeep Khare

परीक्षेला तीस दिवस
मग सहा पेपर
तीस दिवस
सहा पेपर
तीस दिवस
सहा पेपर
मग सुट्टी
सुट्टी

धडयामधील पान
डोक्यावरील तान
आधी त्याला गाडू
मग सुट्टी
आठ दिवस
मग सहा पेपर
आठ दिवस
सहा पेपर
मग सुट्टी

मुलांनो एका पेटीमध्ये चोवीस आंबे आहेत
किती?
चोवीस !
त्यातले बारा बाहेर काढले
तर बेरीज कराल का वजाबाकी?
अं...
आमरस !
आं...
आमरस !
टिव्ही बिव्ही झाला बंद

खेळ बेळ सारे बंद
छंद बिंद सारे बंद
बोंबला...
लाटांवर आल्या लाटा
गणिताच्या भूमितीच्या
विज्ञानाच्या भुगोलाच्या
बोंबला
टिव्ही बिव्ही झाला बंद
खेळ बेळ सारे बंद
छंद बिंद सारे बंद
बोंबला...
लाटांवर आल्या लाटा
गणिताच्या भूमितीच्या
विज्ञानाच्या भुगोलाच्या
बोंबला
पाढे सुत्रे घोकू
मेंदूमध्ये ठोकू
पेपरमध्ये फेकू मग सुट्टी
आता एक दिवस
सहा पेपर
एक दिवस सहा पेपर
मग सुट्टी
हं सांगा
एन्साइक्लोपिडीयाचं स्पेलिंग सांगा
इ एन सी एळ पिडीया
ॲ बावळटा
आता ऑपोझीटचं स्पेलिंग सांगा
ओ डबल पो एस्
बास बास बास बास

PlanetRead

Literacy for a Billion

झोपतानाही उठतानाही
खातानाही पितानाही
आणि तिकडे जातानाही
अभ्यास
बंद सारी बडबड
छातीमध्ये धडधड
पोटामध्ये गडबड
अभ्यास
झोपतानाही उठतानाही
खातानाही पितानाही
आणि तिकडे जातानाही
अभ्यास
बंद सारी बडबड
छातीमध्ये धडधड
पोटामध्ये गडबड
अभ्यास
सांगत नाही खोटे
घडयाळाचे काटे
पुढे करू वाटे
मग सुटट्री
तिन पेपर झाले
तिन पेपर राहीले
तिन झाले तिन राहीले
मग सुट्टी
हं झाला का रे पेपर
झाला सर
तपासलास का?

हो सर
पुन्हा तपास
नको सर
का रे
दर वेळेला वेगळंच
उत्तर येतं सर
पुस्तकांच्या ढिगापुढे
परीक्षेच्या पलीकडे
उन्हाळयाच्या उन्हामध्ये सुट्टी
वाफलेल्या पाण्याचा
पिवळया पिवळया आंब्याचा
गारगार कुल्फीचा सुट्टी
नका काढू पळ
लावू सारे बळ
जरा काढा कळ पळ
दहा
नऊ
आठ
सात
सहा
पाच
चार
तिन
दोन
एक
सुट्टी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*